" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे

स्थापना १९४४

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA 2

**सन १९७६–७७ (शके १८९८–९९) वर्ष ३३ वे**

## वार्षिक वृत्तान्त व समाव्यय

(पुढील वर्षाच्या निकल्पासह)

(वार्षिक निकाय सभेचे निमंत्रण व

सभासदांस विनंती यासाठी मलपृष्ठ २ पहावे.)

प्रकाशक

**वि. वि. सोवनी**, बी. एस्सी.,

**अ. वि. धुळे**

कार्यवाह, ज्यो. प. पुणे.

BOOK-POST

प्रेषक :
ज्योतिर्विद्या परिसंस्था,
७२१।१।१० नवी पेठ,
पुणे ३०.

## वार्षिक निकाय सभेचे निमंत्रण

चालू ३४ व्या वर्षाची निकाय सभा (जनरल बॉडी मीटिंग) रविवार **दि. ९-१०-७७** ला (भारतीय सौर आश्विन १७ शके १८९९) सायंकाळी ६ वा. टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड येथे भरेल. त्या वेळच्या कामकाजाची क्रमणिका खाली दिली आहे. तरी सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

### क्रमणिका

( १ ) दि. १७-१०-७६ च्या वार्षिक निकाय सभेच्या इतिवृत्तास मान्यता.
( २ ) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधाने गतवर्षीतील कार्याचे निवेदन.
( ३ ) गतवर्षाच्या समाव्ययास मान्यता.
( ४ ) १९७७-७८ साठी पदाधिकाऱ्यांची निवड.
( ५ ) १९७७-७८ मध्ये हाती घ्यावयाची कामे.
( ६ ) १९७७-७८ च्या निकल्पावर चर्चा.
( ७ ) परिसंस्थेच्या सामान्य सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ३/- आहे, ती वाढविण्याविषयी विचार.
( ८ ) आयत्या वेळेचे विषय (अध्यक्षांच्या अनुमतीने)
( ९ ) प्राध्यक्षांचे भाषण.
(१०) आभार.

पुणे, भारतीय सौर आश्विन ८ शके १८९९
३० सप्टेंबर १९७७

आपले
**श्री. वि. वि. सोवनी**
**श्री. अ. वि. धुळे**
**कार्यवाह**

**टीप** :– सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी कृपया सभेपूर्वी तीन दिवस, कार्यवाह यांचेकडे तसे लेखी कळवावे.

---

### विनंती

परिसंस्थेची सामान्य सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. तीन आहे. तरी आपली १९७७-७८ ची वर्गणी, तसेच मागील वर्षाची वर्गणी राहिली असल्यास परिसंस्थेकडे पाठवावी अशी विनंती आहे.

**" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ! "**

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे.

स्थापना १९४४
JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

**स्थापना** :– गणेशचतुर्थी शके १८६६ दि. २२-८-१९४४

## सन १९७६-७७ (शके १८९८-९९) चा
## ३३ व्या वर्षाचा वृत्तान्त

ज्योतिर्विद्या परिसंस्थेने आता ३४ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दि. ३० जून १९७७ ला संपलेल्या ३३ व्या वर्षातील संस्थेच्या कार्याचा हा वार्षिक वृत्तान्त व समाव्यय आपणास सादर करण्यास प्रशासक मंडळास आनंद होत आहे.

## सन १९७६-७७ मधील पदाधिकारी

**प्रशासक मंडळ** (Governing Council)

**प्राध्यक्ष** :– प्रि. गो. रा. परांजपे, एम. एस्सी. एफ. एन. आय. ओ. बी. ई. (निवृत्त)

**उपाध्यक्ष** :– (१) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
(२) डॉ. मो. वा. चिपळूणकर, डी. एस्सी.

**नैधिक** :– श्री. य. रा. नेने, एम्. एस्सी.

**कार्यवाह** :– (१) श्री. वि. वि. सोवनी, बी. एस्सी.
(२) श्री. अ. वि. धुळे, डी. एम्. ई. पी. डी. ए. ई.

सदस्य :- (१) श्री. वि. धों. गोरेशास्त्री, ज्योतिर्गणिताचार्य व ज्योतिषालंकार.

(२) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.

(३) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.

(४) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.

(५) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.

(६) श्री. वि. वि. मोडक, जी. सी. डी., जी. सी. सी.

(७) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.

(८) श्री. ग. य. दीक्षित, एम्. ए.

(९) प्रा. अ. त्र्यं ढवळे, एम्. एस्सी.

(१०) प्रा. य. रा. पाटणकर, एम्. एस्सी.

(११) प्रा. सू. शां. चौबळ, एम्. एस्सी.

अंतर्गत अधीक्षक :- श्री. वा. रा. मराठे, बी. ए.

समाव्यय अधिक्षक :- श्री. जी. डी. आपटे आणि कं. चार्टर्ड अकाउंटन्टस्

## तद्विद्य मंडळाचे सभासद (Academic Council)

(१) प्रा. वि. वा. नारळीकर

(२) प्रि. गो. रा. परांजपे

(३) डॉ. मो. वा. चिपळूणकर

(४) प्रा. ना. म. आठवले

(५) प्रा. द. श्री. जोग

(६) श्री. मा. भ. पंत (निमंत्रक)



# वृत्तांतवर्षांतील कार्याचे इतिवृत्त

## सभा–बैठकी

### प्रशासक मंडळाच्या सभा

(१) रविवार दि. १२-९-७६ (भारतीय सौर दि. २१ भाद्रपद शके १८९८) रोजी श्री. स. चिं. मराठे यांच्या घरी भरलेल्या प्रशासक मंडळाच्या सभेत १९७५-७६ या म्हणजे ३२ व्या वर्षाच्या अहवालाच्या कच्च्या खर्डास व समाव्ययास मान्यता देण्यात आली. तसेच सन १९७६-७७ च्या निकल्पाचा खर्डा तयार करण्यात आला. कोणासही सहज आकलन होईल अशी ग्रहस्थितीदर्शक पत्रके प्रयोगादाखल छापण्यास सुरवात करावी असेही या सभेत ठरले.

(२) **प्रशासक मंडळाची दुसरी सभा**– रविवार दि. ९-१-७७ रोजी ज्ञान-प्रबोधिनीत भरली होती. या सभेत संस्थेच्या शिलकी रकमेतून रु. ३०००।– कायम ठेवीत पाच वर्षाकरिता गुंतविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे ग्रहस्थितिदर्शक पत्रके दरमहा प्रसिद्ध करण्याचा उपक्रम चालू ठेवण्याचाही निर्णय घेण्यात आला.

### वार्षिक निकाय सभा

३३ व्या वर्षाची निकाय सभा दि. १७–१०–७६ रोजी (भारतीय सौर आश्विन २५ शके १८९८) सायंकाळी ६ वाजता न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे येथे भरली होती. किमान गणसंख्या न जमल्याने नियमाप्रमाणे अर्धा तास थांबून मग सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. कार्यवाहांच्या विनंतीनुसार डॉ. श्री. मो. वा. चिपळूणकर यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले.

१९७५-७६ या वर्षात संस्थेचे पुढील सभासद दिवंगत झाले.

(१) कै. वासुदेव रघुनाथ बर्वे.

(२) कै. अनंत विष्णु दातार.

(३) कै. दत्तात्रय गो. घाणेकर.

या निकाय सभेस हजर असलेल्या सर्व सभासदांनी १ मिनिट स्तब्ध उभे राहून दिवंगत सभासदांबद्दल दुखवटा व्यक्त केला.

त्यानंतर कार्यवाहांनी आधीच्या निकाय सभेचा वृत्तान्त वाचला व हा वृत्तान्त आणि पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेला गतवर्षीचा कार्यवृत्तान्त व समाव्यय सभेने संमत केले; नंतर नव्या वर्षाकरिता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. कार्यवाहांनी सुचविलेले मंडळ सभेने संमत केले.

पुढील वर्षाकरता मांडलेल्या निकल्पाच्या अनुषंगाने व संस्थेने हाती घ्यावयाच्या कामाच्या दृष्टीने सभेत पुढील सूचना मांडल्या गेल्या व त्यावर सविस्तर चर्चा झाली.

(१) श्री. वि. वि. मोडक– परिसंस्थेचे एक सभासद श्री. पांगारकर पुणे वेधशाळेतील सौरप्रारण विभागात काम करतात. त्यांच्या मदतीने त्या विभागास भेट आयोजित करावी व माहिती घ्यावी.

सभासदांकडून नंतर विशेष प्रतिसाद न मिळाल्याने वरील सूचनेची कार्यवाही होऊ शकली नाही.

श्री. मोडक यांनी आणखीही पुढीलप्रमाणे सूचना केल्या – संस्थेने मामुली स्वरूपाचे कार्य करण्यात समाधान न मानता डॉ. नारळीकर, डॉ. अभ्यंकरांसारख्या विद्वानांना संस्थेत आणून अधिक व्यापक कार्य करावे. घटना आड येत असल्यास ती बदलावी. परिसंस्थेच्या दैनंदिन कामात न गुंतता संशोधन करावे.

ही सूचना कार्यवाहीत आणण्यात येणाऱ्या अडचणी विशद करताना अध्यक्ष डॉ. मो. वा. चिपळूणकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की डॉ. नारळीकर (ज्येष्ठ) प्राध्यक्ष होते त्या वेळी एकही सभासद त्यांच्याकडे कधी चर्चेला वा शंका विचारण्यासाठी जाऊ शकलेला नाही.

त्यांनी आणखीही एक सूचना अशी केली की व्याजाचे उत्पन्न वाढविण्या-साठी सेव्हिंग्ज खात्यात असलेल्या रकमेपैकी काही भाग कायम ठेवीत (५ वर्षे किंवा ७ वर्षे मुदतीसाठी) गुंतवावा; त्याचप्रमाणे त्यांनी असेही सुचविले की महा-पालिकेच्या काही सदस्यांना परिसंस्थेच्या कार्यकारी मंडळावर स्थान दिल्यास महापालिकेचे अनुदान सहज मिळून त्यात वाढही होऊ शकेल.

दि. ९–१–७७ रोजी झालेल्या प्रशासक मंडळाच्या सभेत वरील सूचनेचा विचार होऊन शिलकी रकमेपैकी रु. ३०००/– ५ वर्षे मुदतीच्या कायम ठेवीत गुंतविण्याचा ठराव करण्यात आला व त्याप्रमाणे कॉसमास को. ऑ. अर्बन बँकेत रु. ३००० (रु. तीन हजार) कायम ठेवीत गुंतविण्यात आले. त्याचे व्याज दरमहा संस्थेच्या सेव्हिंग्ज खाती जमा होते.

(२) श्री. अ. वि. घुळे यांनी असे सुचविले की प्रा. ना. म. आठवले यांनी दिलेली दुर्बिण टिळक स्मारक मंदिराच्या गच्चीवर अथवा अन्य सोयीच्या ठिकाणी कायम स्वरूपात बसवावी व तिचा आकाशनिदर्शने करण्यासाठी उपयोग करावा.

या सुचनेनुसार टिळक स्मारक मंदिराच्या गच्चीवर जाऊन प्रशासक मंडळाच्या काही सदस्यांनी त्या जागेची पहाणी केली, त्या वेळी असे दिसून आले



की दुर्बिण कायम स्वरूपात बसवून सार्वजनिक कार्यक्रम करण्यास ती जागा मुळीच सोयीची नाही. शिवाय त्यासाठी येणारा मोठा खर्च विचारात घेता दुसरी जागा शोधण्याची खटपट केली नाही.

(३) श्री. दाते (सोलापूर) यांनी असे सुचविले की हैद्राबाद, मुंबई इत्यादि ठिकाणच्या असेच कार्य करणाऱ्या संस्थांची माहिती ज्यो. परिसंस्थेने मिळवावी आणि त्यांच्याशी संबंध जोडावा. कार्य जोमाने होण्याच्या दृष्टीने एखादा पगारी मनुष्य ठेवावा.

यावर अध्यक्षांनी असे मत व्यक्त केले की पगारी मनुष्याकडून परिसंस्थेचे कार्य आपुलकीने होणार नाही. तेव्हा सभासदांनीच उत्साहाने पुढे येऊन कार्य करावे.

समारोपाच्या भाषणात अध्यक्ष डॉ. मो. वा. चिपळूणकर यांनी असे सांगितले की ज्योतिःशास्त्राचा आवाका फारच वाढल्याने प्रत्येक सभासदाने त्यापैकी विशिष्ट विषय निवडून त्याचे अगदी परिपूर्ण व अचूक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा.

आभार व चहापानानंतर सभेचे कामकाज संपले.

अभ्यास मंडळाच्या सभा– फेब्रुवारी महिन्यापर्यंत अभ्यास मंडळाच्या सभा ज्ञानप्रबोधिनीच्या वर्गात दर रविवारी सायंकाळी ५ ला भरत असत. दि. २० मार्च १९७७ रोजी टिळक स्मारक मंदिरातील एक खोली ज्यो. परिसंस्थेच्या कार्यालयासाठी मिळाल्यावर तेथे अभ्यास मंडळाच्या बैठकी घेण्यास सुरुवात झाली. या सभांना साधारणपणे ६ ते ८ पर्यंत सभासद उपस्थित असत. या सभांमध्ये प्रामुख्याने चर्चिले गेलेले विषय असे–

(१) ग्रहपथप्रकाश, (२) चांद्रमास– अधिक मास, क्षयमास इत्यादि, (३) गुरुच्या चंद्रांबाबत आधुनिक संशोधन, (४) मकरसंक्रांत, (५) ताऱ्यांचे लुक-लुकणे व रंग बदलणे, (६) प्रकाशविवर्तन, (७) मुंबईचे नेहरु प्लॅनेटेरियम, (८) चंद्र व पृथ्वीचा सूर्याभोवतीचा भ्रमणमार्ग इत्यादि.

नवसदस्यांचे स्वागत– १९७६–७७ या वर्षी पुढील नवीन सभासद झाले–

आजीव सदस्य–

(१) प्रा. श्री. प्रभाकर विष्णु सोवनी, पुणे

सामान्य सदस्य–

(१) श्री. बी. एस् देशपांडे, सहकारनगर, पुणे ९;
(२) श्री. अरविंदकुमार गुप्ता, पुणे १६,

(३) श्री. भोसले, मुख्याध्यापक, श्री विठ्ठल विद्यामंदिर हायस्कूल, माही-जळगाव, अहमदनगर,

(४) प्रा. चिम्मड, कर्जत कॉलेज ऑफ आर्टस् अँण्ड कॉमर्स, कर्जत, अहमदनगर,

(५) श्री. सौम्य कीर्ती, रीसर्च अँड डेव्हलपमेंट इंजिनियर जे. एन. मार्शल प्रा. लि. पुणे १८

(६) श्री. सी. पी. रामकृष्णन, टेल्को;

(७) श्री. मिलिंद रामचंद्र दंडवते, आळंदी

(८) श्री. वि. भा. देव, पुणे ४

(९) श्री. क. भा. देव, पुणे ४;

(१०) श्री. जय दत्तात्रय अब्दागिरी, पुणे

(११) श्री. किरण सदानंद कोल्हटकर, सातारा

(१२) कु. सुनीता सदाशिव साठये, डोंबिवली

(१३) श्री. मा. शं. सोवनी, ठाणे.

## संस्थेच्या ग्रंथसंग्रहालयात पडलेली भर

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या कलकत्याच्या अॅलमॅनॅक युनिटकडून दर महिन्यास प्रसिद्ध होणारे अॅस्ट्रॉनॉमिकल बुलेटिन संस्थेस मोफत येत असते.

'रीडर्स डायजेस्ट' ने प्रकाशित केलेला एक जगाचा नकाशा श्री. माधव शंकर सोवनी यांनी परिसंस्थेच्या ग्रंथालयास भेट म्हणून दिलेला आहे.

## वृत्तांतवर्षातील कार्याचा आढावा

(१) संस्थेने या वर्षी एक नवीनच उपक्रम हाती घेतला होता. ऑक्टोबर ७६ ते मार्च ७७ या काळात दरमहा सहज आकलन होईल अशी आकाशस्थ ग्रहगोलांची स्थलकालदर्शक पत्रके प्रसिद्ध केली व ती सर्व सभासदांना व इतर जिज्ञासू व्यक्तींना पुरविली. या पत्रकांमध्ये सूर्यचंद्रांची स्थाने, चंद्राचा तारकामंडलातील मार्ग, ग्रह कोणत्या वेळी कुठे दिसतील यासंबंधी सविस्तर माहिती, तसेच ग्रहांच्या युत्या, सूर्यचंद्रांची ग्रहणे इत्यादि दृश्य ज्योतिष्यकीय आविष्कारांची माहिती दिलेली असे. शिवाय पत्रकांमध्ये वापरलेल्या शास्त्रीय पारिभाषिक शब्दांच्या स्पष्टीकरणासाठी स्वतंत्र टीपाही दिलेल्या असत. अनेक उत्साही निरीक्षकांनी या पत्रकांचा स्वत: वापर करून हा नवा उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे असे अभिप्राय दिले. त्यांपैकी काही अभिप्राय पुढीलप्रमाणे—



श्री. अच्युत शंकर आपटे— पत्र फार उद्बोधक वाटले. सामान्य माणसाला उपयोग व्हावा अशी माहिती त्यात आहे.

श्री. का. म. महाजन— आपला उपक्रम फारच स्तुत्य आहे.

श्री. वि. चिं. गोडबोले— आपले नोव्हेंबर ७६ व डिसेंबर ७६ चे पत्रक मिळाले. उपयुक्त माहिती दिल्याबद्दल अभिनंदन.

डॉ. वा. द. वर्तक— आपला उपक्रम फारच नाविन्यपूर्ण व स्तुत्य वाटला.

श्री. के. ल. जोशी— नाविन्यपूर्ण व शास्त्रशुद्ध माहिती लोकांपर्यंत पोचविता याबद्दल कौतुक.

(२) या वर्षी संस्थेने खालील ठिकाणी आकाशनिदर्शनाचे कार्यक्रम केले.

(अ) दि. २७-११-७६— ४२६ नारायण पेठ, पुणे

(ब) दि. १९-१२-७६— प्रशांतनगर, पुणे ३०

(क) दि. २४-१२-७६— श्री ज्ञानेश्वर विद्यालय, आळंदी

(ड) दि. २९-१-७७— भावेस्कूल, पेरुगेट, पुणे ३०

(इ) दि. २१-२-७७— खडकी केंद्रीय विद्यालय, पुणे

(फ) दि. २३-२-७७— औंध म्युनिसिपल स्कूल नं. ५४ व ४२; औंध

(ग) दि. १३-४-७७— कोठारी बिल्डिंग, पर्वती पायथा, पुणे

(ह) दि. १५-४-७७— श्री. सहस्रबुद्धे, कर्वे रोड, पुणे (गुळवणी महाराजांच्या मठामागे)

श्री. के. ग. भानू, कोथरूड यांच्याकडील ठरलेला कार्यक्रम प्रतिकूल हवामानामुळे होऊ शकला नाही.

वरील कार्याशिवाय परिसंस्थेच्या कार्यकर्त्यांनी व्यक्तिश: निरनिराळ्या मासिकांत व वर्तमानपत्रांत लेख लिहून ज्योति:शास्त्राच्या ज्ञानप्रसाराचे कार्य चालू ठेवले होतेच.

(३) या वर्षातील घडलेली एक आनंदाची घटना म्हणजे नवीन टिळक स्मारक मंदिरामध्ये आपली संस्था व मराठी विज्ञान परिषद यांना संयुक्त रीत्या एक खोली कार्यालयासाठी मिळाली व दि. २० मार्च १९७७ पासून त्या ठिकाणी दर रविवारी नियमितपणे अभ्याससमंडळाच्या बैठका भरण्यास पूर्वीप्रमाणेच सुरुवात झाली.

(४) 'ज्योतिर्विज्ञान' संशोधन केंद्रद्वारा प्रसिद्ध होणाऱ्या 'ज्योतिर्विज्ञान' या त्रैमासिकाच्या प्रथम प्रकाशनाला दि. ३-७-७७ रोजी ३० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त मुंबईस एक समारंभ करून त्यात पुरस्कार न घेता लेख लिहिणाऱ्या लेखकांचा व त्याचबरोबर ज्योतिःशास्त्राची गणित व फलित दृष्टया सेवा करणाऱ्या संस्थांचाही ट्रॉफी देऊन गौरव करण्याचा वरील मासिकाच्या संपादकांचा विचार असल्याचे पत्र संपादकांनी ज्यो. परिसंस्थेस पाठविले आहे. इतर संस्थांमध्ये ज्योतिर्विद्या परिसंस्थेचाही समावेश करण्यात आला असल्याचा त्यांनी पत्रात उल्लेख केला आहे. हे वृत्त सभासदास कळविण्यास आनंद होत आहे.

(५) नू. म. वि. मधील गणिताचे अध्यापक कै. धों. गो. वैद्य यांच्या मृत्युपत्राच्या विश्वस्तांनी कै. वैद्य यांच्या इच्छेनुसार त्यांच्या निधीचा अनुदान वितरण समारंभ दि. ३-१०-७६ रोजी केला. त्या वेळी विश्वस्तांनी ज्यो. परिसंस्थेस देणगी म्हणून रु. ५०० ।– चा चेक संस्थेचे प्राध्यक्ष श्री. गो. रा. परांजपे यांच्याकडे सुपूर्त केला. परिसंस्था त्याबद्दल विश्वस्तांची आभारी आहे.

(६) गेली काही वर्षे अभ्यासमंडळाच्या साप्ताहिक बैठका ज्ञानप्रबोधिनी प्रशालेच्या चालकांच्या सौजन्याने प्रशालेतील एका वर्गात भरत असत. या सहाय्याबद्दल परिसंस्था ज्ञानप्रबोधिनी प्रशालेच्या चालकांची आभारी आहे.

(७) परिसंस्थेचे एक आजीव सदस्य श्री. जे. डी. कपाडिया यांच्या विनंतीनुसार त्यांच्या Evolution of matter पुस्तकातील सोळाव्या पाठाचे मराठींत भाषांतर केले.

□ □ □



Dated at Poona 25 August 1977
Trustees Sd. V. V. Sowani
Secretary,
Sd. Y. R. Nene
Treasurer. 1–9–77

As per our report of even date
Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants,
Auditors

## Jyotirvidya Parisanstha, Pune.

**Statement of Receipts & Payments for the year ended 30–6–77**

| Receipts | Rs. Ps. | Payments | Rs. Ps |
|---|---|---|---|
| **Opening balance as on 1–7–76** | | **Salary** | 233–50 |
| Cash on hand 69-44 | | **Printing & stationery** | 540–69 |
| Saving with | | **Conveyance** | 35–10 |
| Cos. Co-op. | | **Postage & revenue** | |
| Bank in S. B. A/c. | | **stamps** | 119–30 |
| 5382–82 | 5452–26 | **Other office expenses** | |
| **Subscriptions** | | (Including Payment of charges | |
| Ordinary members | | for Office room) | 357–25 |
| 249–00 | | **Annual Meeting** | 23–55 |
| Life members | | **Transport expenses** | 22–95 |
| (including part | | **Audlt Fee** | 25–00 |
| Payments) 161-00 | 410–00 | **Repairs, equipment** | |
| **Donation** | | **& furniture** | 187–00 |
| Earmarked for Bldg | | **Closing balance** | |
| & Equipment Fund | 525–00 | Cash on hand 216–34 | |
| **Grant** | | Savingsin bank2212–67 | |
| from Director of | | | 2429–01 |
| Education | 120–00 | Fixed Deposit with | |
| **Sale** of books | 86–00 | Cos. co-op. Bank | 3000--00 |
| **Interest** | | | |
| Saving A/c 224–51 | | | |
| Fixed deposit 155–58 | 380–09 | | |
| Total Rs | 6973-35 | Total Rs. | 6973--35 |

Examined & found correct
S/d for G. D. Apte & Co.
Chartered Accountants

25–8–77

G. D. APTE & Co. Schedule IX Phone : 45892
Chartered Accountants vide Rule 17 (1) United Western Bank Bldg.
Registered No. F-44 Laxmi Road, Poona-2
Dated : 25 August 77

Name of the Public Trust :– Jyotirvidya Parisanstha, Poona
Income and Expenditure Account for the year ending
30 th June 1977

| Expenditure | Rs. | Ps. | Income | Rs. | Rs. |
|---|---|---|---|---|---|
| To Establishment Expenses : | | | By Interest on Bank A/c | 380-09 | |
| Salary | 233/50 | | By Donations | | |
| Annual meeting | 23/55 | | Earmarked in kind or cash | 525-00 | |
| Print. Stationery | 259/45 | | Grants | 120-00 | |
| Conveyance | 23/75 | | By General Subscription | 249-00 | |
| Postage | 48/30 | | By Sale of Books | 74-75 | |
| Other expenses | 357/25 | | By Deficit carried over to Balance Sheet | 1290-05 | |
| Repairs | 187/00 | | | | |
| | | 1132–80 | | | |
| To Research Fund | | | | | |
| To Depreciation | | 569–55 | | | |
| Library Books | | | | | |
| Furniture and Deadstock | | | | | |
| Equipment | | | | | |
| To Transfers to Specific R. Funds : | | 525–00 | | | |
| Building & Equipment Fund | | | | | |
| To expenditure on objects of the trust, educational | | 386–54 | | | |
| To Audit fee | | 25–00 | | | |
| Total Rs. 2638–89 | | | Total Rs. 2638--89 | | |

## ज्योतिर्विद्या परिसंस्था, १९७७–७८ (शके १८९९ ते १९००) चा निकल्प.

| आय | रु. पै | व्यय | रु. पै |
|---|---|---|---|
| (१) सामान्य सदस्य वर्गणी | २७०–०० | ( १ ) वेतन | ४८०–०० |
| (२) देणग्या-शासकीय | ३००–०० | ( २ ) कचेरी खर्च | ०८०–०० |
| महानगरपालिका | ३००–०० | ( ३ ) सामानदुरुस्ती | ०८०–०० |
| इतर | २००–०० | ( ४ ) वाहनखर्च | ०७०–०० |
| (३) व्याज | ४३०–०० | ( ५ ) जागा देखभाल | ३००–०० |
| (४) आजीव सदस्य शुल्क | १००–०० | ( ६ ) अहवाल, पत्रिका व इतर मुद्रण | ६५०–०० |
| (५) प्रकाशन विक्री | ५०–०० | ( ७ ) वार्षिक सभा | ०३५–०० |
| | | ( ८ ) ऑडिट फी | ०२५–०० |
| | १६५०–०० | ( ९ ) टपाल हशील | २००–०० |
| अपेक्षित तूट | १८२०–०० | (१०) ग्रंथसंग्रह | ३५०–०० |
| | | (११) स्फुट व्याख्याने, चित्रपट | ७००–०० |
| | | (१२) कायम निधी | ५००–०० |
| एकूण रु. | ३४७०–०० | एकूण रु. | ३४७०–०० |